जिल्हा रुग्णालय, नंदूरबार, जि.नंदूरबार येथील २७८ अस्थाई पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः पदआ २०१८ /प्र.क्र.१३२/आरोग्य-३

१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते.रुग्णालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: ०४ मे , २०१८

वाचा -

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक - पदआ २०१७ /प्र.क्र.५३/ आरोग्य -३, दिनांक- २५.०१.२०१८.
२) आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे/कक्ष-३/टे-५अ/जि.रु. नंदूरबार/अपदे/३८४८-४९/१८, दिनांक-२७.०४.२०१८.

शासन निर्णय-

उपरोक्त अ.क्र.१ येथील शासन निर्णयान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांच्या अधिपत्याखालील जिल्हा रुग्णालय, नंदूरबार येथील २७८ अस्थाई पदांना दि.०१.०१.२०१८ ते दि. २८.०२.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

२. आता या शासन निर्णयान्वये सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार जिल्हा रुग्णालय, नंदूरबार येथील सदर २७८ पदांना दि.०१.०३.२०१८ ते दि.३०.०९.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. सदर पदांवरील खर्च खालील लेखाशिर्षातून खर्ची घालण्यात यावा आणि हा खर्च सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

१) मागणी क्रमांक-आर-१

२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०१ - नागरी आरोग्य सेवा - विषम चिकित्सा
११० - रुग्णालये व दवाखाने
११०-२ - मुसफल क्षेत्रातील व दवाखाने
(०१)(०१) - मुसफल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये (२२१० ०१४६)

२) **<u>मागणी क्रमांक-आर-१</u>**

२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

०६ - सार्वजनिक आरोग्य

००१ - संचालक व प्रशासन

००१- (०८) - प्राथमिक आरोग्य केंद्राचा ग्रा.रु.इतका दर्जा वाढविणे (२२१० ०४१३)

३) **<u>मागणी क्रमांक-आर-१</u>**

२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

०६ - सार्वजनिक आरोग्य

००१ - संचालक व प्रशासन

(०१)(०९) - महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्पांतर्गत ग्रामिण/कुटीर रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करणे (२२१० ४६२४)

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/आपुक-१,दि- ०५.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२६१३२२५०८७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.05.04 12:26:55 +05'30'

(रो.दि.कदम-पाटील)
अवरसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई नागपूर
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. संचालक,आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा, (रुग्णालये-राज्यस्तर) मुंबई.
५. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) मुंबई.
६. उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक.

७. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नंदूरबार.

८. जिल्हा कोषागार अधिकारी, नंदूरबार.

९. वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.

१०.कार्यासन अधिकारी, सेवा-२/सेवा-३/ सेवा-५/अर्थसंकल्प, सा.आ.वि. मंत्रालय,मुंबई.

११.निवडनस्ती (आरोग्य-३)

विवरण पत्र "अ"

कार्यालय - जिल्हा रुग्णालय, नंदुरबार.

अ.क्र.	तात्पुरती पदे प्रथम ज्या शा.नि.अन्वये निर्माण झाली तो क्र.व दिनांक	पदनाम	पदा ची संख्या	वेतनश्रेणी	ज्या शा.नि.अन्वये पदे पुढे चालू ठेवण्यात आली तो शा.नि.क्र.व दिनांक	ज्या दिवसापासून पदे चालू ठेवावयाची तो दिनांक	लेखाशिर्ष	पद पुढे चालू ठेवण्या बाबत आवश्यकता
३	शानिक्र/जिरुसा/२००६/१० ३१/प्रक३४८/आ-३/मंत्रालय, मुंबई दि २७/२/०८ अन्वये २०० खाटांचे जिल्हा रुग्णालय,मंजुर करण्यात आले.	निवासी वैद्यकिय अधिकारी (ब्राहयसंपर्क)	१	१५६००-३९१०० ग्रेडपे ७६००	महाराष्ट्र शासन सा.आ वि.शा. नि.क्र.-पदआ २०१४/ प्रक६७/ आरोग्य-३/ मंत्रालय, मुंबई. दिनांक २२/५/१४ नुसार ८० अस्थायी पदांना मुदतवाढ तसेच म.शा.सा.आ.वि. पदओ/२०१४/प्रक्र६७/आ-३ मंत्रालय,मुंबई दि.२२/५/१४ नुसार १२ अस्थायी पदांना मुदतवाढ एकुण ९२ अस्थायी पदांना मुदतवाढ	०१/०३/२०१८ ते २८/०२/२०१८	मागणी क्रमांक आर-१ (योजनेतर) २२१० वैद्यकिय सेवा व सार्वजनीक आरोग्य ०१ नागरीआरोग्यसेवा विषमचिकीत्सा ११० रुग्णालये व दवाखाने ११० (२)मुफसल क्षेत्रातील रुग्णालये व दवाखाने (०१) (०१)मुफसल अध्यापनेतर शासकिय रुग्णालये २२१००१४६	जिल्हा रुग्णालयात आवश्यक त्या सेवा पुरविण्याकरीता पदे पुढे चालु ठेवणे अत्यंत आवश्यक
४		वैद्यकिय अधिकारी(भिषक)	१	१५६००-३९१०० ग्रेडपे ७६००				
५		वैद्यकिय अधिकारी (शस्त्रक्रिया	१	१५६००-३९१०० ग्रेडपे ७६००				
६		वैद्यकिय अधिकारी (स्त्रिरोग व प्रसुतीशास्त्रतज्ञ)	१	१५६००-३९१०० ग्रेडपे ७६००				
७		वैद्यकिय अधिकारी (बालरोग)	१	१५६००-३९१०० ग्रेडपे ७६००				
८		अस्थिव्यंगशल्य चिकीत्सक	१	१५६००-३९१०० ग्रेडपे ७६००				
९		बधिरीकरणशास्त्रज्ञ	१	१५६००-३९१०० ग्रेडपे ७६००				
१०		क्ष-किरण शास्त्रज्ञ	१	१५६००-३९१०० ग्रेडपे ७६००				
११		शरिरविकृती चिकीत्सक	१	१५६००-३९१०० ग्रेडपे ७६००				
१२		मनोविकृती चिकीत्सक	२	१५६००-३९१०० ग्रेडपे ७६००				
१३		वैद्यकिय अधिकारी (चर्मरोग)	१	१५६००-३९१०० ग्रेडपे ७६००				
१४		वैद्यकिय अधिकारी (क्षयरोग)	१	१५६००-३९१०० ग्रेडपे ७६००				
१५		नेत्रशल्य चिकीत्सक	१	१५६००-३९१०० ग्रेडपे ७६००				
१६		वैद्यकिय अधिकारी (कान/नाक/घसा)	१	१५६००-३९१०० ग्रेडपे ७६००				
१७		वैद्यकिय अधिकारी (रुग्णालयीन प्र. वि.साठी)	१	१५६००-३९१०० ग्रेडपे ७६००				
१८	शानिक्र/जिरुसा/२००६/१० ३१/प्रक३४८/आ-३/मंत्रालय, मुंबई दि २७/०२/२००८ अन्वये २०० खाटांचे जिल्हा रुग्णालय,मंजुर करण्यात आले.	वर्ग-२ वैद्यकिय अधिकारी ५ अतिदक्षताविभाग ३ शुश्रृषा कक्ष ३ ट्रामाकेअर युनीट ५ सिटीस्कॅन विभाग २	१७	१५६००-३९१००				
१९		दंत शल्यचिकित्सक वर्ग-२	१	९३००-३४८००				
२०		अधिसेवीका	१	९३००-३४८००				
२१		बालरोगपरीचारीका २ नवजातबालकांचेअतिदक्षताविभाग १	३	९३००-३४८००				
२२		आरोग्यपरीचारीका १ शुश्रृषा प्रशिक्षण विभागाससाठी २	३	९३००-३४८००				
२३		परीसेविका ९ अतिदक्षताविभाग २ शुश्रृषा कक्षासाठी १ मनोविकृती चिकीत्सा कक्ष १	१३	९३००-३४८००				

२४		मनोविकृतीपरीचारीका १ मनोविकृती चिकीत्सा कक्ष २	३	९३००-३४८००				
२५		अधिपरीचारीका ३७ अतिदक्षता विभाग ६ नवजात बालकांचाअतिदक्षता विभाग ४ शुश्रृषा कक्षासाठी ८ मनोविकृती चिकीत्सा कक्षासाठी ६ जळीत कक्षासाठी २ ट्रामा केअर युनीट ३ सीटी युनीट १	६७	९३००-३४८००				
२६		वैद्यकिय सामाजीक कार्यकर्ता	१	९३००-३४८००				
२७		मनाविकृती सामाजीक कार्यकर्ता १ मनोविकृती चिकीत्सा कक्षासाठी १	२	९३००-३४८००				
२८		रक्तपेढीतंत्रज्ञ	१	९३००-३४८००				
२९		प्रयोगशाळा तंत्रज्ञ	१	९३००-३४८००				
३०		सिटीस्कॅन विभागासाठी ३	३	९३००-३४८००				
३१		औषध निर्माता	२	९३००-३४८००				
३२		दंतआरोग्यक	१	५२००-२०२००				
३३	शानिक्र/जिरुसा/२००६/१०३१/प्रक३८८/आ-३/मंत्रालय मुंबई दि २७/२/२००८ अन्वये २०० खाटांचे जिल्हा रुग्णालय,मंजुर करण्यात आले.	दंतयांत्रिकी	१	५२००-२०२००				
३४		रुग्णवाहीकाचालक ४ ट्रामा केअर युनीट साठी वा.चा १	५	५२००-२०२००				
३५		भांडार तथा वस्त्रपाल	१	५२००-२०२००				
३६		अभिलेखापाल १ सिटीस्कॅन विभागासाठी १	२	५२००-२०२००				
३७		वीजतंत्री	१	९३००-३४८००				
३८		स्वच्छतानिरीक्षक	१	५२००-२०२००				
३९		दुरध्वनीचालक	२	५२००-२०२००				
४०		शिंपी	१	५२००-२०२००				
४१		नळकारागिर	१	५२००-२०२००				
४२		सुतार	१	५२००-२०२००				
४३	शासननिर्णयक्रमांक आरएलएच/१०९८/१९७५/प्रक्र३१९/आरोग्य-४/मंत्रालयमुंबई दिनांक ३/७/१९९९	वरिष्ठलिपीक	१	५२००-२०२००	महाराष्ट्र शासन सा.आ वि.शा. नि.क्र.-पदआ २०१७/ प्रक. ५३/ आरोग्य-३/ मंत्रालय, मुंबई. दिनांक २५/०१/२०१८	१/३/२०१८ ते २८/०२/२०१९		
४४		लघुटंकलेखक (मराठी) वर्ग--३	१	९३००-३४८००				
४५		टंकलेखंक १ व कनिष्ठ लिपीक ५	१	५२००-२०२००				
४६		सांख्यिकीसहाय्यक वर्ग-३	१	९३००-३४८००				
४७		सिस्टर टयुटर वर्ग-३ (शुश्रृषा प्र. वि. साठी	५	९३००-३४८००				
४८		गृहवस्त्रपाल वर्ग-३(शुश्रृषा प्र. वि. साठी	१	९३००-३४८००				

४९		क्लिनीकल इन्स्ट्रक्टर (शुश्रूषा प्र. वि. साठी	२	९३००-३४८००				
५०		समोपदेष्टा(मनो.चि.कक्ष)	१	९३००-३४८००				
५१		ऑक्युपेशन थेरपिस्ट (अपंग पुर्नवसन केंद्रासाठी)	१	९३००-३४८००				
५२		ऑथेरटिस्ट कम प्रोस्टेटिक तंत्रज्ञ(अपंग पुर्नवसन केंद्रासाठी	१	९३००-३४८००				
५३		लेदर वर्कर(अपंग पुर्नवसन केंद्रासाठी	१	९३००-३४८००				
५४		कक्षसेवक	३०	४४४०- ७४४०				
५५		शिपाई	६	४४४०- ७४४०				
५६		मुकादम	२	४४४०- ७४४०				
५७		बाहयरुग्णसेवक	४	४४४०- ७४४०				
५८		अपघातविभागसेवक	४	४४४०- ७४४०				
५९		रक्तपेढीपरीचर	१	४४४०- ७४४०				
६०	शासननिर्णयक्रमांक आरएलएच/१०९८/१९७५ /प्रक्र३१९/ आरोग्य-४/मंत्रालयमुंबई दिनांक ३/७/१९९९	प्रयांगशाळापरीचर	२	४४४०- ७४४०				
६१		क्षकिरण परीचर	२	४४४०- ७४४०				
६२		शस्त्रक्रीयागृहपरीचर	१	४४४०- ७४४०				
६३		व्रणोपचारक	१	४४४०- ७४४०				
६४		धोबी	३	४४४०- ७४४०				
६५		न्हावी	२	४४४०- ७४४०				
६६		उद्वाहक चालक	१	४४४०- ७४४०				
६७		पहारेकरी	४	४४४०- ७४४०				
६८		माळी	२	४४४०- ७४४०				
६९		सहाय्यकस्वयंपाकी	२	४४४०- ७४४०				
७०		सफाईगार	३९	४४४०- ७४४०				
७१		आया	३	४४४०- ७४४०				
७२		सहाय्यक गट-ड	१	४४४०- ७४४०				
७३		मदतनिस	१	४४४०- ७४४०				
७४		एकुण	२७८					